| MHJN100006232023 | दाखल दिनांक १७/०७/२०२३<br>नोंदणी दिनांक १७/०७/२०२३<br>निकाल दिनांक ०८/०५/२०२६<br>कालावधी ०२ व. ०९ म. २२ दि. |
|---|---|

**मंठा येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे न्यायालयात**
(**पिठासीन अधिकारी – श्रीमती एल. पी. धन्वे**)

**कि. दि. अर्ज क्र. ५२/२०२३** **निशाणी क्र.१ वरील आदेश**

१) **विठ्ठल श्रीनिवासराव जोशी,**
वय ६३ वर्ष, धंदा शेती

२) **अनंत श्रीनिवासराव जोशी,**
वय ६१ वर्ष, धंदा – शेती

३) **सुधीर श्रीनिवासराव जोशी,**
वय ५७ वर्ष, धंदा – शेती
अर्जदार क्र. १ ते ३ रा. मंठा, ता. मंठा, जि. जालना

४) **लक्ष्मीबाई भ्र. बालासाहेब कुलकर्णी,**
वय ६७ वर्ष, धंदा – घरकाम
रा. औंढा नागनाथ, ता. औंढा, जि. हिंगोली

५) **मिरा भ्र. संतोषराव देशमुख,**
वय ६५ वर्ष, धंदा – घरकाम
रा. अंबड, ता. अंबड, जि. जालना .. **अर्जदार**

**– <u>विरुध्द</u> –**

**लक्ष्मीबाई भ्र. प्रल्हाद नंद,**
वय ७० वर्ष, धंदा – घरकाम,
रा. नेर, ता. जि. जालना ... **गैरअर्जदार**

---

श्री. डी.एस. लिंबुळकर, अर्जदारातर्फे वकील
श्री. ऐ.ऐ. कुलकर्णी, गैरअर्जदारातर्फे वकील

---

**निशाणी क्र. १ वरील आदेश**

(पारीत दिनांक :– ०८/०५/२०२६)

१. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, **श्रीनिवास रावजी जोशी** हे अर्जदार व गैरअर्जदार यांचे वडील असून त्यांचा मृत्यु दि. ३०/११/१९९६ रोजी मौजे मंठा, ता. मंठा, जि. जालना येथे झाला. अर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, मयताची पत्नी व अर्जदार व गैरअर्जदार यांची आई नामे अनुसया श्रीनिवास जोशी यांचे दि. १४/०१/२०२१ रोजी निधन झालेले आहे. अर्जदार तसेच गैरअर्जदार हे मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती केली.

२. अर्जदार यांनी मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांची मुलगी लक्ष्मीबाई प्रल्हाद नंद यांना अर्जदार म्हणून समाविष्ट होण्यास विनंती केली असता त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना गैरअर्जदार म्हणून प्रस्तुत प्रकरणात अर्ज दाखल करते वेळी समाविष्ठ केले व पुढे कथन केले आहे की, अर्जदार तसेच गैरअर्जदार हे मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांचे एकमेव कायदेशीर वारस असून मयतास त्यांच्या व्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे व त्यांना शासकीय व

निमशासकीय कांमाकरीता मयताच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे त्यांना मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याची विनंती केली.

**३**. गैरअर्जदार ही विधीज्ञांमार्फत प्रकरणात हजर झाली. त्यानंतर तिने नि.क्र. १५ वरील लेखी म्हणणे सादर करुन कथन केले आहे की, अर्जदार यांनी त्यांना अर्जात समाविष्ट होण्याची विनंती केलेली नाही, तसेच अर्जदारांनी दत्तक गेलेल्या मुलाला अर्जदार म्हणून समाविष्ट केलेले आहे. तसेच अर्जदारांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे कारण नसुन त्यांना दुस–याच कारणासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचा अर्ज नाकारण्याची विनंती केली आहे.

**४.** अर्जदार यांनी नि.क्र. १८ वर दुरुस्ती करण्याकरीता अर्ज दाखल केले व मुळ अर्जातील अर्जदार क्र. ३ दिनकर श्रीनिवास जोशी हे दत्तक गेलेले असल्यामुळे त्यांना वगळून मयत श्रीनिवास रावजी जोशी यांचे वारस म्हणून ईतर अर्जदार व गैरअर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळण्याची विंनती केली आहे. सदरील अर्जावर गैरअर्जदार यांनी त्यांचे लेखी म्हणने सादर केले. त्यानंतर सदर अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यात आला व त्याअनुषंगाने मुळ अर्जातून अर्जदार क्र. ३ दिनकर श्रीनिवासराव जोशी यांचे नाव कमी करण्यात आले. त्यानंतर अर्जदारांनी अर्जाची दुरुस्ती प्रत न्यायालयात दाखल केली आहे.

**५.** प्रस्तुतचा अर्ज, गैरअर्जदार यांचे लेखी म्हणने, अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज निर्णयांकीत करणेकामी खालील मुद्दे विचाराधीन होतात. मी त्यांचे उत्तर खालील नमुद केलेल्या कारणास्तव पुढील प्रमाणे नोंदविलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र. १ ते ५ व गैरअर्जदार हे मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांचे कायदेशिर वारस असल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | होय |
| २ | अर्जदारांनी विनंती केल्याप्रमाणे अर्जदार वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय |
| ३ | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते २ करीता**ः–

**७**. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र. २ अनंत श्रीनिवासराव जोशी यांनी पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. १९ वर दाखल केले. कागदपत्रांच्या यादीसोबत अर्जदाराच्या वतीने अर्जदार क्र. २ यांच्या आधारकार्डची प्रत नि.क्र. २० वर, मयत अनुसया श्रीनिवास जोशी यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत नि.क्र. २१ वर, मयत श्रीनिवास रावजी जोशी यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत नि.क्र. २२ वर, अर्जदार क्र. १ विठ्ठल श्रीनिवासराव जोशी यांच्या आधारकार्डची प्रमाणीत प्रत नि.क्र. २३ वर अर्जदार क्र. ३ सुधीर श्रीनिवास जोशी यांच्या आधारकार्डची प्रत नि.क्र. २४ वर, अर्जदार क्र. ५ मिरा संतोष देशमुख यांच्या आधारकार्डची प्रत नि.क्र. २५ वर, अर्जदार क्र. ४ लक्ष्मीबाई कुलकर्णी यांच्या आधारकार्डची प्रत नि.क्र. २६ वर दाखल केली आहे. तसेच नि.क्र. २७ दि. ०९ डिसेंबर २०२३ रोजीचे वर दैनिक पुण्यनगरीतील जाहिर प्रगटन दाखल केले आहे. अर्जदाराने त्यांचा पुरावा नि.क्र.२८ वर पुरसीस दाखल करून**श्रीनिवास रावजी जोशी** बंद केला आहे.

८. तसेच गैरअर्जदाराने नि.क्र. १५ वर लेखी जवाब दाखल केले आहे. तसेच नि.क्र. २९ वर पुरसीस दाखल करुन गैरअर्जदारांचा पुरावा बंद केला आहे.

९. अर्जदार व गैरअर्जदार यांनी **श्रीनिवास रावजी जोशी** हे मयत असल्याचे मान्य केले आहे. तसेच नि.क्र. २२ वरील मृत्यु प्रमाणपत्रावरून हे निश्चित होते की, **श्रीनिवास रावजी जोशी** हे दि. ३०/११/१९९६ रोजी मौजे मंठा, ता. मंठा, जि. जालना येथे मयत झाले आहेत.

**१०.** प्रस्तुत प्रकरणात महत्वाचा वादातील मुद्दा हा आहे की, मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांचे कायदेशीर वारस कोण आहेत व त्यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यास कोण पात्र आहेत.

**११**. अर्जदारांच्या वतीने अर्जदार क्र. २ यांनी नि. क्र. १९ वरील पुराव्याचे शपथपत्रात असे नमुद केले आहे की, मयत **श्रीनिवास रावजी जोशी** हे अर्जदार क्र. १ ते ५ व गैरअर्जदार यांचे वडील आहेत. तसेच मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांचा मृत्यु हा दि. ३०/११/१९९६ रोजी झालेला आहे. त्यामुळे मयत यांना अर्जदार क्र. १ ते ५ तसेच गैरअर्जदार हेच एकमेव वर्ग–१ वारस आहेत.

**१२**. याउलट गैरअर्जदार यांनी नि.क्र. १५ वर पुरावा दाखल केला असून कथन केले आहे की, अर्जदार यांनी गैरअर्जदारास जाणुनबाजुन काही आर्थिक मदत मिळू नये या हेतूने प्रेरित होवून त्यांना अर्जात अर्जदार म्हणून समाविष्ट केलेले नाही.

**१३**. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार क्र. १ ते ५ व गैरअर्जदार हे मयत **श्रीनिवास रावजी**

**जोशी** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वाद नाही. प्रस्तुत प्रकरणात अर्जदारांनी संपत्ती बाबत कोणतीही मागणी केलेली नाही. अर्जदारांनी केवळ मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी मागणी केली आहे. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे त्यांना सदर वारस प्रमाणपत्र हे शासकीय व निमशासकीय कामांसाठी हवे आहे. त्यांनी अर्जामध्ये मयत यांच्या कोणत्याही चल व अचल मालमत्तेचा उल्लेख केलेला नाही. अर्जदारांनी तशी कोणतीही मागणी केलेली नसल्यामुळे गैरअर्जदाराच्या आक्षेपात कोणतेही तथ्य असल्याचे दिसून येत नाही.

**१४.** अर्जदार व गैरअर्जदार हे धर्माने हिंदु आहेत. त्यामुळे हिंदु वारसा कायद्या प्रमाणे एखादा पुरूष मयत झाल्यानंतर त्यास मुलगा, मुलगी, विधवा पत्नी, आई, नातु, नात वगैरे वर्ग–१ मधील वारस असतात. मयत पुरूषाचे वडील, भाउ व बहिण हे वर्ग–२ मधील वारस असतात. तसेच हिंदु वारसा कायदा कलम ८ प्रमाणे मयत पुरूषास त्याचे वर्ग–१ मधील वारस असल्यास बाकीचे वारसांना सदर मयत पुरूषाचे वारस म्हणुन कोणतेही हक्क व अधिकार प्राप्त होत नाही. प्रस्तुत प्रकरणात मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यास अर्जदार क्र. १ ते ५ व गैरअर्जदार क्र. १ हेच कायदेशीर व वर्ग–१ मधील वारस आहेत हे उपलब्ध पुराव्यावरून स्पष्ट होते. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे हिंदु वारसा कायदा कलम ८ चे अनुषंगाने फक्त अर्जदार क्र. १ ते ५ व गैरअर्जदार हेच मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांचे वर्ग–१ चे वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब मी मुद्दे क्र.१ ते २ यांचे उत्तर होकारार्थी नोंदविले आहेत.

<u>मुद्दा क्र.३ करीता</u>:–

**१५**. मी मुद्दे क्र.१ ते २ यांचे नोंदविलेले उत्तराप्रमाणे मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांचे अर्जदार क्र. १ ते ५ व गैरअर्जदार हे वारस असून तेच मयत

**श्रीनिवास रावजी जोशी** यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असल्याने मी मुद्दा क्र. ३ चे उत्तरार्थ पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज **मंजुर** करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ **विठ्ठल श्रीनिवास जोशी,** अर्जदार क्र. २ **अनंत श्रीनिवास जोशी,** अर्जदार क्र. ३ **सुधीर श्रीनिवास जोशी,** अर्जदार क्र. ४ **लक्ष्मीबाई भ्र. बालासाहेब कुलकर्णी,** अर्जदार क्र. ५ **मिरा भ्र. संतोष देशमुख,** व गैरअर्जदार **लक्ष्मीबाई भ्र. प्रल्हाद नंद** हे मयत **श्रीनिवास रावजी जोशी** यांचे कायदेशीर वारस असले बाबतचे वारसाचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे.

३. अर्जदार व गैरअर्जदार यांनी आपआपला खर्च सोसावा.

४. सबब, संचिका निकाली काढण्यात आली.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.05.08 14:35:22 +0530

(**एल. पी. धन्वे**)

दिनांक : ०८/०५/२०२६

दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर)
मंठा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणीत करण्यात येते की, पी.डी.एफ. संचिकेतील प्रत्येक शब्द न शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नावे – अक्षय ईश्वर देशपांडे

न्यायालयाचे नाव – दिवाणी न्यायालय (क.स्तर), मंठा

पिडीएफ दिनांक – ०८/०५/२०२६

**स्वाक्षांकीत/–**

लघुलेखक